# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 143/2024 दिनांक :19.04.2024**

## 1)चोरी :–

**कुंडलवाडी :–** दिनांक 15.04.2024 रोजी चे 01.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे अंगणात मौ. हुनगुंदा ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाई जेवण करून घराचे अंगणाचे समोर झोपली असताना यातील नमुद आरोपीने फिर्यादी ही झोपल्याचा फायदा घेऊन फिर्यादीचे गळयातील पाच ग्रॅम सोन्याचे मनी मंगळसुत्र किंमती 25,000/–रू चे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी रूक्मिणीबाई शंकर भालेराव, वय 60 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. हनुगुंदा ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 41/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1921 कदम, मो.क्रं. 9404010999** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**मुदखेड :–** दिनांक 14.04.2024 रोजी चे 17.00 ते 18.00 वा. चे दरम्यान, **पचंलिंग हॉस्पीटल समोरील मोकळया जागेतुन मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे होंडा शाईन कंपणची मोटार सायकल क्रमांक एमएच–26/बीके–3618 किंमती 60,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी पंडीत नागोराव पवार, वय 60 वर्षे, व्यवसाय शेती रा. वाई ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 59/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2187 आलेवार, मो.क्रं. 9158756087** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**इतवारा :–**दिनांक 15.04.2024 रोजी चे 00.30 वा. चे सुमारास, **हबीब टाकी चौक नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचे वडील मोटार सायकलवर जात असतांना आरोपीने विनाकारणर फिर्यादीचे वडीलाचे मोटार सायकलला पाठीमागुन लाथ मारून जमीनीवर पाडले व फिर्यादीस त्याचे जवळील चाकुने डाव्या कमरेच्या वर मारून गंभीर दुखापत केली. ते रे को गोली मारता असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी अब्दुल रेहान पी. अब्दुल रहेमान, वय 20 वर्षे, व्यवसाय ॲटो चालक रा. फत्तेबुरूज झेंडा गल्ली नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 100/2024 कलम 326, 504, 506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास प्रो पोउपनि/श्री पवार, मो. नं. 7387576912** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :–

**देगलुर :–** दिनांक 21.05.2021 ते दि. 16.04.2023 च्या दरम्यान, **फिर्यादीचे सासरी लाईनगल्ली देगलुर व माहेरी बल्लुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आठ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहीस, तु तुझे माहेरचे लोक आमचा मानपान केला नाही. तुला मुलबाळ होत नाही तसेच तुला नांदावयाचे असेल तर माहेरहुन एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ व मारहाण करून शारीरीक व माणसीक त्रास दिला व फिर्यादीस माहेरी सोडुन देवुन तु जर माहेरहुन एक लाख रूपये घेवुन आली नाहीस तर तुला खतम करतो अशी जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 23 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 169/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2437 इंगोले, मो.क्रं. 9423440472** हे करीत आहेत.

## 5)पळवुन नेले :–

**मुखेड :–** दिनांक 17.04.2024 रोजी चे सायंकाळी 20.30 ते 21.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे शेतातील आखाडयावरून बेळी बुं. शिवार ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **मुलगा नामे प्रमोद शिवाजी पाटील, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. बेळी बुं. ता. मुखेड जि. नांदेड** यास यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून अज्ञात कारणावरून प्रमोद यास जबर दुखापत करण्याच्या किंवा ठार मारण्याच्या उद्देशाने कारमध्ये अपहरण करून कोठेतरी गुप्तपणे अज्ञात स्थळी नेऊन मारहाण करीत आहे. वगैरे **फिर्यादी शिवाजी गोविंदराव पाटील, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. बेळी बुद्रुक ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 132/2024 कलम 363, 364, 365, 367, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री विनोद चव्हाण, मो.क्र. 9767747774** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड